RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ४, अंक १५०] शनिवार, नोव्हेंबर १७, २०१८/कार्तिक २६, शके १९४० [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ४२१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक १७ नोव्हेंबर २०१८

**अधिसूचना**

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६.**

क्रमांक गौखनि. १०/०२१५/प्र.क्र. ९२/ख.—महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. ४१) याच्या कलम ४८ चे पोट-कलम (९) आणि कलम ३२८ चे पोट-कलम (१) व पोट-कलम (२) चा खंड (एकोणीस) तसेच कलम ३२९ यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने करण्याचे योजलेल्या, महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजांचे उत्खनन व ती काढणे) नियम, १९६८ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठीच्या नियमांचा पुढील मसुदा उक्त संहितेच्या कलम ३२९ च्या पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

१. या नियमांस, महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजांचे उत्खनन व ती काढणे) (दुसरी सुधारणा) नियम, २०१८, असे म्हणावे.

२. महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजांचे उत्खनन व ती काढणे) नियम, १९६८ यांच्या नियम ३ ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येईल :—

"३. **गावकऱ्यांनी त्यांच्या स्वतःच्या वापरासाठी वाळू काढणे.**—(१) या नियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने, तहसीलदाराची लेखी पूर्व परवानगी घेऊन, आणि जिल्हाधिकारी यांनी वाळू उत्खननासाठी पर्यावरण अनुमती घेऊन लिलावासाठी निश्चित केलेल्या मात्र यशस्वीरित्या बोली न लागलेल्या वाळूघाटांपैकी अथवा या कारणास्तव जिल्हाधिकाऱ्याकडून विशेषतः राखीव ठेवण्यात आलेल्या वाळूघाटापैकी या प्रयोजनासाठी निश्चित केलेल्या वाळूघाटातून प्रचलित दरानुसार स्वामित्वधनाचे प्रदान करून, कोणत्याही गावातील कोणत्याही रहिवाशास, त्याच्या घरगुती किंवा शेतीच्या प्रयोजनासाठी (ज्यामध्ये विहीर बांधण्याचा समावेश असेल) पाच ब्रासपेक्षा अधिक नाही एवढी वाळू काढण्यास परवानगी देता येईल :

परंतु, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांकरिता असलेल्या शासनाच्या कोणत्याही गृहनिर्माण योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या व्यक्तीस, तहसीलदारांची लेखी पूर्व परवानगी घेऊन, जिल्हाधिकारी यांनी वाळू उत्खननासाठी पर्यावरण अनुमती घेऊन लिलावासाठी निश्चित केलेल्या मात्र यशस्वीरित्या बोली न लागलेल्या वाळूघाटांपैकी अथवा या कारणास्तव जिल्हाधिकाऱ्याकडून विशेषतः राखीव ठेवण्यात

आलेल्या वाळूघाटापैकी या प्रयोजनासाठी निश्चित केलेल्या वाळूघाटातून कोणतीही फी किंवा स्वामित्वधन न आकारता, अशा गृहनिर्माण योजनेअंतर्गत स्वत:च्या घराच्या बांधकामासाठी पाच ब्रासपेक्षा अधिक नाही एवढी वाळू काढण्यास परवानगी देता येईल.

(२) वाळू काढण्यासाठीच्या अर्जाची तपासणी केल्यानंतर, या प्रयोजनार्थ निश्चित केलेल्या अशा वाळूघाटातून वाळू काढण्याची अशी लेखी परवानगी, असा अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या कालावधीच्या आत तहसीलदाराकडून देण्यात येईल."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेंद्र क्षीरसागर,**
शासनाचे सहसचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Marg, Mantralaya, Mumbai 400 032,
dated the 17th November 2018

*NOTIFICATION*

MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.

No. Gaukhani. 10/0215/C.R. 92/Kh.—In exercise of the powers conferred by sub-section *(9)* of section 48 and sub-section *(1)* and clause *(xix)* of sub-section *(2)* of section 328 read with section 329 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Land Revenue (Extraction and Removal of Minor Minerals) Rules, 1968, the same having been previously published as required by sub-section *(1)* of section 329 of the said Code, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Land Revenue (Extraction and Removal of Minor Minerals) (Second Amendment) Rules, 2018.

2. For rule 3 of the Maharashtra Land Revenue (Extraction and Removal of Minor Minerals) Rules, 1968, the following rule shall be substituted, namely :—

" 3. *Removal of sand by villagers for their own use*.—(1) Subject to the provisions of these rules, any resident of any village may, for his own domestic or agricultural purpose, including building of well, may be permitted to remove not more than five brass sand, with the prior permission of the Tahsildar in writing and on payment of royalty as per the prevailing rates from a sand ghat, designated by the Collector for this purpose, which, after receipt of environmental clearance, was put to auction but was not successfully bid for or which were specifically reserved for this purpose, by the Collector :

Provided that, a person who is beneficiary of any housing scheme of the Government for the economically weaker sections may be permitted to remove not more than five brass sand for the construction of his own house under such housing scheme, with the prior permission of the Tahsildar in writing without payment of any fee or royalty from a sand ghat, designated by the Collector for this purpose, out of the sand ghats which, after receipt of environmental clearance, were put to auction, but were not successfully bid for or which were specifically reserved for this purpose by the Collector.

(2) The Tahsildar, after examining such application for removal of sand, may grant permission to remove sand from such a sand ghat which is designated or reserved for this purpose within a period of fifteen days, from the date of receipt of such application.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJENDRA KSHIRSAGAR,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.